# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक २८/२०२१** **दिनांक ०६/०४/२०२१** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३१/०३/२०२१ ते ०६/०४/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०७/०४/२०२१ सकाळी ८:३० पासून ११/०४/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **३१/०३** | **०१/०४** | **०२/०४** | **०३/०४** | **०४/०४** | **०५/०४** | **०६/०४** | | **०७/०४** | **०८/०४** | **०९/०४** | **१०/०४** | **११/०४** |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३० | ३० | ३१ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २३ | २३ | २३ | २३ | २४ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | निरभ्र | निरभ्र | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६४ | ६४ | ७४ | ६८ | ६० |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ५० | ५० | ४९ | ४३ | ३९ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ७ | ३ | ३ | ५ | ५ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | द. | आ.पू. | पू. | द. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **०.०** | **३०९०.६** |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयात दिनांक ७ ते ११ एप्रिल, २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहून तापमानात फारसा बदल संभवत नसून कमाल तापमान ३० ते ३२ अं.सें. आणि किमान तापमान २३ ते २४ अं.सें. दरम्यान राहील तसेच दिनांक ९ ते ११ एप्रिल, २०२१ दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहील.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक ९ ते १५ एप्रिल, २०२१ दरम्यान कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | - | • खरीप हंगामाच्या पिक लागवडीसाठी पूर्वतयारी म्हणून जमिनीची खोल नांगरणी करून जमीन १५ ते २० दिवस उन्हात तापून दयावी जेणेकरून किड, रोगाच्या सुप्तावस्था नष्ट करण्यास मदत होईल. |
| **विशेष सल्ला** | - | • आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले “रक्षक फळमाशी सापळा” प्रती एकरी २ या प्रमाणात बागेमध्ये टांगावेत. |
| **आंबा** | फळधारणा | • **वाढीच्या अवस्थेत (वाटाणा ते सुपारी आकाराची फळे)** असलेल्या आंबा झाडाला ताण बसून फळगळ होण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्यातून एकदा १०० लिटर पाणी प्रति झाड किंवा १५ दिवसातून एकदा १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात फळे सुपारी आकाराची होईपर्यंत दयावे तसेच झाडाच्या बुंध्याभोवती आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे. मात्र फळे काढणीस तयार |

| | | |
|---|---|---|
| | | होण्याच्या एक महिना अगोदर झाडास पाणी देणे बंद करावे.<br>• मोठ्या आकाराच्या आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने बागेमधील गळलेली फळे गोळा करून नष्ट करावीत आणि आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती एकरी २ या प्रमाणात बागेमध्ये झाडांच्या उंचीप्रमाणे साधारण जमिनीपासून २ ते ३ मीटर उंचीवर राहील अशा प्रकारे टांगावा. |
| **काजू** | फळधारणा | • काजूमध्ये रोठा या किडीच्या (खोडकिडीचा) प्रादुर्भावाकडे खोडाचे वेळोवेळी निरीक्षण करावे. खोडकिडीचा प्रादुर्भाव झाडाचे खोड व उघडी मुळे यावर दिसून येतो. खोडकिडीचा रोठ्याची कीड झाडाची साल पोखरून आतील गाभा खाते. खोडाला पडलेल्या छिद्रातून भुसा बाहेर पडलेला दिसतो. खोडातून भुसा येताना दिसल्यास त्वरित नियंत्रणाचे उपाय करावे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी १५ एम. एम. पटाशीच्या सहाय्याने खोडाची प्रादुर्भावीत साल काढून रोठयाला बाहेर काढून मारुन टाकावे व प्रवाही क्लोरपायरीफॉस २० टक्के ५० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यामध्ये मिसळून साल काढलेला भाग द्रावणाने चांगला भिजवावा. झाडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये व इजा झाल्यास त्याला बोर्डो पेस्ट लावून जखम झाकावी. झाडाची मुळे उघडी राहणार नाही याची नेहमी काळजी घ्यावी. नियमित बागेची गवत काढून साफसफाई करावी. वाळलेल्या फांद्या कापलेल्या भागावर डांबर लावावे जेणेकरून किडीचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल. |
| **नारळ** | फळधारणा | • नारळामध्ये सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भावाकडे माडाचे वेळोवेळी निरीक्षण करावे. या किडीच्या अळ्या माडाच्या खोडातील मऊ गाभा खाऊन खोड आतून पोखरून काढतात. अळ्या खोडाच्या आत असल्याने प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बुंध्यावर छिद्रे दिसतात व त्यातून ताजा भुसा व तांबूस तपकिरी स्त्राव वाहताना दिसतो. किडीच्या नियंत्रणासाठी छिद्रातून शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात. माडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये आणि झाल्यास त्याला बोर्डोपेस्ट लावावी. तसेच सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति एकरी १ गंध सापळा लावावा. गंध सापळयात असलेले आमिश (लुअर) साधारण दोन ते तीन महीन्यांपर्यत कार्यक्षम राहते. |
| **नवीन फळबाग लागवड** | - | • नवीन फळबाग लागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये साफ सफाई करून घ्यावी. |
| **उन्हाळी भात** | फुलोरा | • उन्हाळी भात फुलोऱ्या अवस्थेत असल्याने खाचरात पाण्याची पातळी ५-१० सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• उन्हाळी भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असताना नत्र खताची तिसरी मात्रा ४२५ ग्रॅम युरिया प्रती गुंठा देण्यात यावी. |
| **वाल, चवळी** | पक्वता | • पक्व शेंगांची तोडणी करून ४ ते ५ दिवस शेंगा उन्हात वाळवाव्यात व मळणी करावी किंवा शेंगा झाडावर वाळल्यानंतर पिकाची कापणी करून झाडे खळ्यावर ३ ते ४ दिवस उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणूकीमध्ये भुंग्याचा उपद्रव टाळण्यासाठी वालाचे दाणे मातीच्या खळीचा थर देऊन चांगले वाळवावेत. |
| **पशुसंवर्धन** | - | • जनावरांना पायलाग रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने जनावरांना लसीकरण करून घ्यावे. |
| **कुकुटपालन** | - | • पक्ष्यांना रानीखेत रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.